SANGOLA TALUKA SHETKARI SHIKSHAN PRASARAK MANDAL'S

# Vidnyan Mahavidyalaya, Sangola

NAAC Re-Reaccreditation Grade "B"

## 5.2.3 - Number of students qualifying in state/national/ international level examinations during the year-2022-23

## One of our student is selected in MPSC (Government of Maharashtra)

## DEPUTY REGISTRAR, CO-OP. SOCIETIES, GROUP-A

## Documents

## Selection letter of students in  Maharashtra Public Service Commission

महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

**क्रमांक :** 1477[2]/2021/वीस **बैठक क्रमांक :** **दिनांक :** 23 जून, 2023

**प्रति ,**
**KOLEKAR VILAS SHIVAJI (003031202204042200001014)**

**विषय :- राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-2021 नियुक्तीसाठी शिफारशी करण्याबाबत.**

महोदय /महोदया,

उपरोक्त विषयासंदर्भात आपणांस असे कळविण्यात येते की, राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-2021 च्या दिनांक 15 जून, 2023 रोजी जाहीर केलेल्या अंतिम निकालातील आपला गुणवत्ताक्रम व आपण विविध पदांसाठी दिलेला पसंतीक्रम विचारात घेऊन आपली **DEPUTY REGISTRAR, CO-OP. SOCIETIES, GROUP-A** या पदावर नियुक्तीकरिता अप्पर मुख्य सचिव (सेवा), महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग (18ब), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-400 032 / प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग (नवि-4), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-400 032 यांच्याकडे शिफारस करण्यात आली आहे.

2. राज्य सेवा परीक्षेद्वारे नियुक्त होणा-या गट-अ व गट-ब मधील अधिका-यांचा एकत्रित प्रशिक्षण कार्यक्रम शासनाकडून आयोजित करण्यात येईल. याबाबतचा तपशील आपणांस शासनाकडून स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.

3. सदर परीक्षेच्या जाहिरातीत काही पदांकरिता विशिष्ट शैक्षणिक अर्हता व शारीरिक मानके विहित करण्यात आली आहेत. अशा पदावर शिफारस झाली असल्यास त्याबाबतची आपण पूर्तता करीत असल्यासच अशा उमेदवारांच्या नियुक्तीकरिता विचार करण्यात येईल. अन्यथा नियुक्ती प्राधिकारणाकडून नियुक्ती रद्द करण्यात येईल याची आपण नोंद घ्यावी.

4. आपण प्रस्तुत परीक्षेच्या अर्जात नमूद केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने सदर परीक्षेच्या जाहिरातीतील विहित केलेल्या तरतुदीनुसार आपली सर्वंकष पात्रता मूळ प्रमाणपत्रांवरून शासनाकडून / शासनाच्या सक्षम प्राधिका-यांकडून तपासण्याच्या अधीन राहून आपली शिफारस करण्यात आली आहे. तपासणीअंती आपण प्रस्तुत परीक्षेच्या अर्जात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा अर्जातील दाव्यानुसार आपण आवश्यक त्या प्रमाणपत्राची पूर्तता न केल्यास / विहीत पात्रतेच्या अटीची पूर्तता करीत नसल्याचे आढळून आल्यास कोणत्याही टप्प्यावर आपली शिफारस / नियुक्ती रद्द करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

5. प्रस्तुत परीक्षेचा निकाल समांतर आरक्षणाच्या, अनाथ आरक्षणाच्या व अन्य मुद्यांसंदर्भात विविध मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम न्याय निर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

6. आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर असलेला साक्षांकन नमुना डाऊनलोड करून आणि संपूर्ण भरून तो अप्पर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग (18-ब) मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-400032 / प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, (नवि-4) मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-400 032 यांच्याकडे तात्काळ परस्पर पाठवावा. साक्षांकन नमुन्यातील अटक, शिक्षा, दंड व इतर कारवाई इत्यादीची माहिती संबंधित रकान्यात होय किंवा नाही या उत्तराने भरावी. अन्यथा साक्षांकन नमुना स्वीकारला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

7. नियुक्ती संबंधातील पुढील सर्व पत्रव्यवहार उपरोक्त प्राधिका-यांकडेच करण्यात यावा.

आपला विश्वासू ,

(सु. सु. चंद्रमोरे)
अवर सचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई